Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-2 | Aug-2014
Available online at www.lbp.world

मानवतावाद आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ. सौ. मीना गायकवाड
प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

प्रस्तावना :–

मानवतावाद ही माणूस म्हणून जगण्याची, आपल्या बरोबर इतर माणसांनाही माणसासारखे जगता येवू देण्याची, त्याला मदत करण्याची साधी, सोपी, सरळ जीवनपध्दत आहे. त्यात कोणतेच कडक कर्मकांड नाहीत, कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाही. ज्या ज्या वेळी जगात मानवतावादावर चर्चा होईल, विचार होईल त्या त्या वेळी अग्रक्रमाने डॉ.बाबासाहेबांच्या विचार होईल. 'मानवतावाद' या संकल्पनेच्या इतिहासात गेलोतर रानटी टोळी अवस्था मानवाने सोडून जवळजवळ दहा हजार वर्षे झाली तेंव्हा माणूस ज्यावेळी स्थिर जीवन जगण्याकडे वळू लागला होता. तेंव्हाच नितिमत्ता आणि मानवतावाद जन्माला आला. डॉ.बाबासाहेबांनी हयातभर इतके वैविध्यपूर्ण, बहुआयामी स्वरुपाचे काम केले आहे आणि ते सखोल, सम्यक स्वरुपात केले आहे. त्यामुळे त्यांना अभ्यासणे, समजून घेणे वाटते तितके सोपे व झेपणारेही नाही, असे माझे मत आहे. अवघ्या विश्वातील ज्या मोजक्या गणमान्य व्यक्ती आहेत, त्या सर्वांमधे मानवाधिकार, मानवतावाद या विचारांच्या बाबतीत डॉ.बाबासाहेबांचे स्थान अव्वल आहे यात शंका नाही.

डॉ. बाबासाहेबांच्या विचार कार्याला समजून घेताना भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी पासून ते स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आधुनिक भारताची उभारणी करतांना, भारतातील अनेक पेच सोडवताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मानवतावादी विचारावरची आपली नजर जराही हटू दिली नाही. वर्षानूवर्षे, शतकानूशतके भारतात राहणाऱ्या दिनदलित, शूद्र समजल्या जाणाऱ्या वर्गाला साठलेल्या पाण्यासारखे, एकाच जागी थांबून तुंबून जगावे लागले. त्याला वाहते करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. भारतातील मध्ययुगीन (मुस्लीम राजवटीचा) काळ तर धर्माच्या युध्दाने ग्रासलेला होता. हजारो, लाखो माणसे आजवर मेली. साधारण तेराव्या शतकापासून १९ व्या शतका पर्यंतच्या कालखंडात वेळोवेळी सुधारणा होत गेल्या. या काळालाच भारताच्या इतिहासातील प्रबोधनाचा कालखंड असे म्हणतात. याच काळात 'सर्व माणसे सारखी आहेत' हा विचार रुजायला प्रारंभ झाला. जपानच्या बादशहाने जमीनदारी नष्ट करण्याचे दिलेले आदेश, फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली स्वातंत्र्य, समता व न्याय ही मानवतावादी मूल्ये मानवतावादाचे जागतिक पातळीवर स्वरुप स्पष्ट करतात. तर भारताच्या म. फुल्यांनी प्रथम मानवी हक्काच्या कामाची कृतीशीलपणे सुरवात केली. अर्थात बुध्दकाळ, इतिहासातील सम्राट अशोक त्यांच्या काळातील अशोक स्तंभ यावरुन मानवतावादी विचारांचा प्रत्यय येतो. पण १९ व्या शतकातील म. फुल्यांच्या कार्यामुळे त्याला चालना मिळाली. प्रस्तुत लेखात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी विचार कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

घटनात्मक तरतूदी आणि मानवतावाद:–

संविधान हा भारताचा वैशिष्टपूर्ण, महत्वाचा दस्तऐवज आहे. ज्यावर भारत भक्कमपणे उभा आहे. भारताचा जो विकास झाला आहे व होणार आहे. त्या घटनेतील तरतूदींमुळेच.

घटनेतील मुलभूत तत्वे आणि अधिकार (Fundamental Rights) यातूनही मानवतावादी विचार स्पष्ट होतात. यावर भाष्य करतांना डॉ.बाबासाहेब म्हणाले होते, "Fundamental Rights are Human Rights" and Human Rights are Fundamental Rights पुढेते म्हणतात, ''घटनेतील मुलभूत अधिकार स्थगित केले तरी मानवाचे जन्मताच असलेले अधिकार कायम राहतात.'' जीवनाचा हक्क हा निसर्गदत्त आहे. तो स्थगित होत नाही आणि तो कोणाला स्थगित करताही येत नाही, याची खंबीरपणे जाणिव त्यांनी संसदेलाही करुन दिली होती.

भारतातल्या लोकशाहीने सर्वांना समान मत दिले. त्यामुळे सर्वाची पत सारखी झाली, पण या समाजाने, देशाने ही पत मिळू दिली नाही. डॉ.बाबासाहेबांनी मोठ्या चळवळी करुन लढे, देऊन ती पत मिळवली ती 'मानवतावादी' विचार कार्यानेच.

भारतीय राज्यघटनेतील उदारमतवादी रुपाची प्रचिती विभाग ३ मधील मुलभूत अधिकारांतून येते. यातून मानवाधिकार स्पष्ट होतो. १२ ते १८ कलम यावरुन कायद्यासमोर नागरिकांची समानता किंवा धर्म, वंश, जात, लिंग, प्रांत आदी मुद्याव्दारा न केला जाणारा भेदभाव स्पष्ट होतो. तर १७ वे कलम दलितांच्या अत्याचाराविरुध्दचे विशेष महत्वाचे आहे. २५ ते ३० ही सहा कलमे धर्म स्वातंत्र्याच्या हक्काबाबत आहेत. घटनेतील समान कायदा करण्यासंबंधीचे ४४ वे कलम यावर आधारित आहे. म्हणजेच घटनेतील विविध कलमांच्या विवेचनातून बाबासाहेबांच्या विचारातील मानवतावाद स्पष्ट करतात.

आंबेडकरी चळवळी आणि मानवतावाद :–

अनेक अभ्यासक, अनेक तज्ञ, संशोधक यांच्या मते साधारणत: १९२७ च्या महाडचा सत्याग्रह, आणि १९५६ चे धर्मांतर ह्या मधला काळ हा आंबेडकरी चळवळींचा काळ मानला जातो. डॉ.बाबासाहेबांच्या नेतृत्वाचा काळ मानला जातो.

१) १९–२० मार्च १९२७ महाडचा चवदार तळे सत्याग्रह.
२) २६ डिसेंबर १९२७ स्त्रियांसमोर केलेले भाषण.
३) २५ डिसेंबर १९२७ मनुस्मृतीचे दहन.
४) १९२७ साली अमरावती–अंबाबाई मंदीर सत्याग्रह.
५) १३ ऑक्टोंबर १९२९ सालचा पुण्यातील पर्वती मंदिर सत्याग्रह.
६) मार्च १९३० ते १९३५ दरम्यान नाशिक येथील काळाराममंदिर प्रवेशाचे सत्याग्रह.
७) १३ ऑक्टोंबर १९३५– धर्मांतराची घोषणा.
८) ८ ते १० ऑगस्ट १९३० अखिल भारतीय दलीत काँग्रेस अधिवेशन.
९) बुलढाणा–मलकापूर– अस्पृश्य महिला परिषद.
१०) ०६ एप्रिल १९४० चे बोरगांव येथील अस्पृश्य परिषद.
११) २० जुलै १९४२ अखिल महिला दलित परिषद.
१२) १६ जून १९३६ मुंबई परळ दामोदर हॉलमधील परिषद.
१३) १२ ऑगस्ट १९४८ नंतर डॉ.बाबासाहेबांनी तयार केलेले हिंदू कोडबील.
१४) १४ ऑक्टोंबर डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखालाचे १९५६ चे धर्मांतर.

डॉ.बाबासाहेबांच्या हयातीतील प्रत्यक्ष त्यांच्या नेतृत्वाखाली १९२७ च्या महाड सत्याग्रहापासून ते १९५६ च्या धर्मांतर चळवळीतून अशा प्रत्येक कार्यांतून मानवतावादासाठी मानवतावादी दृष्टीने त्यांनी केलेले कार्य स्पष्ट होते. स्त्रियांमधे स्वाभिमान जागा करण्याची क्षमता त्यांच्या प्रखर अशा शब्दातल्या भाषणातून दिसते. मनृस्मृती दहनापूर्वी स्त्रियांना उद्देशून केलेले भाषण इतके प्रभावशाली ठरले लगेचच भाषणाच्या दूसऱ्या दिवसापासून स्त्रियांच्या विचार, राहणीमान कृती यातून

सकारात्मक, मानवतावादी कार्यपूरक बदल झाले. अधिक स्वाभिमानाने त्या मानवतावादाच्या लढाईत सक्रिय सहभागी झाल्या, विविध पदावर सक्षमपणे काम करु लागल्या, अनेक वेश्यांनी आपलला व्यवसाय सोडून गृहस्थीचे संस्कारी जीवन जगू लागल्या. अनेक अभ्यासकांनी आंबेडकरी चळवळीचा अभ्यास करुन काढलेला हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष आहे की, रक्ताचा एकही थेंब न पाडता आंबेडकरांच्या अनुयायांनी कार्य केले, लढे दिले, चळवळी केल्या. हे त्यांच्या कार्यांचे फार वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्टय होय. हे अधोरेखित झालेच पाहीजे.

१९५६ च्या धर्मांतराच्या घटनेनंतर दबलेल्या, तुंबलेल्या, साठलेल्या अन्यायग्रस्त दलीत समाजाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रवाही करुन मानवतेच्या वाटेवर आणले. लाचार समाजाला स्वाभिमानेच्या वाटेवर आणून मानवतावादाचे परमोच्च काम केले, याला जगात तोड नाही.

बाबासाहेबांच्या अनुयायांनी ती वाट कशी चालायची हा त्यांचा प्रश्न आहे. पण बाबासाहेबांनी दिलेली वाट प्रकाशाची, प्रगतीची, आनंदाची आहे. मानवतावादाची आहे. शेवटी इतकेच म्हणावेसे वाटते डॉ.बाबासाहेब म्हणजेच मानवतावाद.

संदर्भ :–

१) पवार उर्मिला–मून मिनाक्षी–आम्हीही इतिहास घडविला–१९८९.